परिपत्रक नं. ३३ (अत्यंत महत्वाचे) रयत शिक्षण संस्था, सातारा
(जनरल विभाग) ता. १५/१२/२०२१

**सर्वश्री शाखाप्रमुख,**
**रयत शिक्षण संस्था,**

**यांना ...**

**विषय: लाईफ वर्कर करुन घेण्यासाठी अर्ज मागविणेबाबत.**

संस्थेच्या घटनेनुसार खालील अटीस पात्र असणा-या सेवकांकडून **'लाईफ वर्कर'** करुन घेण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरचे परिपत्रक आपल्या शाखेतील सर्व सेवकांना दाखवून त्यावर त्यांच्या सह्या घ्याव्यात व त्याची झेरॉक्सप्रत कार्यालयाकडे पाठवून द्यावी.

**दि. १४/१२/२०२१** रोजी खालीलपैकी कोणतीही एक शैक्षणिक पात्रता धारण करणा-या व खालील निकषास पात्र असणा-या शिक्षक सेवकांना लाईफ वर्कर होण्यासाठी अर्ज करता येईल.

**लाईफ वर्कर करुन घेण्यासाठी असणारे निकष:**

१) संस्थेतील जे शिक्षक सेवक ४४ ते ५४ या वयोगटात आहेत, त्यांना लाईफ वर्कर होण्यासाठी अर्ज करता येईल.

२) लाईफ वर्कर होण्यासाठी घटनेनुसार खाली नमुद केलेली शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे.

a) Ph.D. Degree of a recognized University.
b) Masters Degree of a recognized University.
c) B.T., B.Ed. or B.P.Ed. of a recognized University
d) B.E. of a recognized University
e) M.B.B.S. of a recognized University.
f) D.T.Ed.
g) A Degree of foreign University of repute.
h) A.M.
i) LL.M.

**शाखाप्रमुखांशिवाय इतर शिक्षकांसाठीचे निकष -**

**अ)** लाईफ वर्कर होण्यासाठी अर्ज करणा-या शिक्षकाने एखादा विषय एस.एस.सी./ एच.एस.सी./विभागीय बोर्डाच्या/विद्यापीठीय/ शासकीय परीक्षा मंडळाच्या परीक्षेसाठी शिकविलेला असला पाहिजे व तो शिकवित असलेल्या विषयाचा गेल्या पाच वर्षापैकी किमान तीन वर्षाचा निकाल एस.एस.सी./ एच.एस.सी./विभागीय बोर्डाच्या / विद्यापीठीय / शासकीय परीक्षा मंडळाच्या निकालापेक्षा जास्त असावा.

**पान नं. २ वर . . . . .**

**ब)** अर्जदाराला कोणत्याही प्रकारची शिक्षा झालेली नसावी. तसेच संस्था व अर्जदार यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचे कायदेशीर प्रकरण असता कामा नये. त्याने काम केलेल्या शाखांशी निगडीत असलेले त्याचे आर्थिक व्यवहार पूर्ण असणे आवश्यक आहे.

**क)** अर्जदाराचे मागील पाच वर्षाचे गोपनीय अहवाल चांगले असावेत. संपूर्ण सेवाकालातील संस्थानिष्ठा व शाखेच्या रचनात्मक कामाविषयी ज्याच्या हाताखाली शेवटच्या पाच वर्षात त्यांनी काम केले, त्या शाखाप्रमुखांचा अभिप्राय विचारात घ्यावा. वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांचे मागील ५ वर्षातील सेवेसंदर्भात त्या त्या प्राचार्यांचे अभिप्राय विचारात घ्यावेत.

**ड)** शैक्षणिक कामाव्यतिरिक्त अर्जदाराने शाखेच्या व संस्थेच्या विकासासाठी विशेष उल्लेखनीय काम केलेले असावे. तसेच त्याने प्रौढ शिक्षण, सामाजिक वनीकरण, अंधश्रध्दा निर्मूलन, जनशिक्षण, आरोग्य शिबीरे, ललित कला, सांस्कृतिक कार्य,लेखन संपादन, संशोधन, क्रीडा,लोकसंख्या शिक्षण, व्यसनमुक्ती, पर्यावरण, स्त्रीमुक्ती चळवळ अशाप्रकारचे सामाजिक काम केलेले असावे. शिवाय त्याला शैक्षणिक कार्यासाठी असलेले शासकीय /निमशासकीय गौरवात्मक पारितोषिके तसेच जिल्हा परिषद / राज्य /राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झालेले असल्यास ती विशेषबाब म्हणून लक्षात घ्यावी.

**इ)** संस्थानिष्ठा - संपूर्ण सेवाकालावधीतील संस्थानिष्ठा व चारित्र्य चांगले असावे.

**ई)** अर्जदाराची जनमानसातील प्रतिमा स्वच्छ असणे अनिवार्य आहे.

**शाखाप्रमुखांसाठी निकष -**

**अ)** १. लाईफ वर्कर होण्यासाठी अर्ज करणा-या शाखाप्रमुखाने किमान एखादा विषय एस.एस.सी./एच.एस.सी./विभागीय बोर्डाच्या / विद्यापीठीय / शासकीय परीक्षा मंडळाच्या परीक्षांसाठी शिकविलेला असावा. तो शिकवित असलेल्या विषयाचा व त्याच्या शाखेचा गेल्या पाच वर्षापैकी किमान तीन वर्षाचा निकाल हा एस.एस.सी./एच.एस.सी./ विभागीय बोर्डाच्या/विद्यापीठीय/ शासकीय परीक्षा मंडळाच्या निकालापेक्षा जास्त असावा. जर एखाद्या सेवकाची शाखाप्रमुख म्हणून झालेली सेवा पाच वर्षापेक्षा कमी असेल तर अशा सेवकांचा शिक्षक/ पर्यवेक्षक/ उपमुख्याध्यापक म्हणून असलेला कालावधी विचारात घ्यावा.

२. जे उपमुख्याध्यापक किंवा सुपरवायझर सकाळ सत्रामध्ये काम करीत असतील (इ.५वी ते इ.७ वी अखेर) तर अशा सेवकांपैकी ज्या सेवकांचे कार्य उल्लेखनीय असेल त्यांचे बाबतीत इ.१० वी इ.१२ वीच्या निकालाबाबतची अट शिथिल करावी.

**ब)** अर्जदाराचे मागील पाच वर्षाचे गोपनीय अहवाल तसेच शालेय कामकाजाबाबतचे इन्स्पेक्टर, सहसचिव (उ.शि./ माध्य.),सचिव व शासकीय तपासणीचे अभिप्राय समाधानकारक असावेत.

अर्जदाराला कोणत्याही प्रकारची शिक्षा झालेली नसावी. तसेच संस्था व अर्जदार यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचे कायदेशीर प्रकरण असता कामा नये. त्याने काम केलेल्या शाखांशी निगडीत असलेले त्याचे आर्थिक व्यवहार पूर्ण असणे आवश्यक आहे.

**क)** संस्थानिष्ठा - संपूर्ण सेवाकालावधीतील संस्थानिष्ठा व चारित्र्य चांगले असावे.

**ड)** शाखा विकास - इमारत बांधकाम, मिळविलेली देणगी, जमीन संपादन, जनसंपर्क तसेच त्याचा सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमातील सहभाग असणे गरजेचे आहे.

**पान नं. ३ वर . . . . .**

**इ)** पुरस्कार - त्याला शैक्षणिक कार्यासाठी असलेले कर्मवीर पारितोषिक / जिल्हापरिषद/ नगरपालिका/ राज्य/ राष्ट्रीय/ तालुका पंचायत पुरस्कार मिळालेले असल्यास ती विशेषबाब म्हणून लक्षात घ्यावी.

**ई)** शाखाप्रमुखाची जनमानसातील प्रतिमा स्वच्छ असणे अनिवार्य आहे.

**लाईफ वर्करसाठीच्या अर्जाची विक्री - दि. १७/१२/२०२१ ते दि. २७/१२/२०२१** अखेर **कार्यालय, रयत शिक्षण संस्था, सातारा (जनरल विभाग)** येथे कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) चालू राहील.

**अर्जाची किंमत - रु. १,०००/- आहे.**

**मुदत** - रीतसर भरलेले अर्ज कार्यालयात पोहोच करण्याची अंतिम मुदत **दि. ०३/०१/२०२२** रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत राहील. **दि. ०३/०१/२०२२** नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**सूचना** -

१) शिक्षक / प्राध्यापक यांचे अर्ज मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी, मुख्याध्यापकांचे अर्ज विभागीय अधिका-यांनी, विभागीय अधिका-यांचे अर्ज सहसचिव (माध्यमिक) यांनी, तर प्राचार्यांचे अर्ज सहसचिव (उच्च शिक्षण), रयत शिक्षण संस्था,सातारा यांचेमार्फत कार्यालयाकडे पाठवून द्यावेत.

२) अर्ज परस्पर पाठविल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

३) शाखाप्रमुखांनी / विभागीय अधिका-यांनी आपली शिफारस अर्जावर न करता गोपनीय पत्राने पाठवून द्यावी.

कळावे.

**(प्रिं.डॉ. विठ्ठल शिवणकर)**
**सचिव,**
**रयत शिक्षण संस्था, सातारा**

**टीप : कायमच्या पत्त्यासाठी संबंधित सेवकाने आपल्या सेवापुस्तकातील पहिल्या पानाची छायांकित प्रमाणित केलेली प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.**

**प्रत माहितीसाठी रवाना ...**

०१. सहसचिव (उ.शि.), रयत शिक्षण संस्था, सातारा
०२. सहसचिव (माध्य.), रयत शिक्षण संस्था, सातारा
०३. ऑडिटर, रयत शिक्षण संस्था, सातारा.
०४. सर्वश्री विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था,